महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- 400 001 . दुरध्वनी क्र. 022-22620304
Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-मराकशिमं-२०२४/संलग्नता परिपत्रक/256 दिनांक:- २१.०८.२०२४

email द्वारे

परिपत्रक

प्रति,

१. अधिष्ठाता/प्राचार्य, शासकीय कला परिसंस्था,

२. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय अनुदानित,
विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था.

**विषय:- पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या कला संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेणेबाबत.**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे क्र. मराकशिमं-२०२४/संलग्नता परिपत्रक/१६५ दि. ०२.०८.२०२४ रोजीचे परिपत्रक.

२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेची दि. १३.०८.२०२४ रोजीची प्रथम बैठक.

संदर्भ १. अन्वये महाराष्ट्र राज्यातील कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संस्थेतील अभ्यासक्रमांना दि. १४.०८.२०२४ पर्यंत मंडळाची संलग्नता घेणेबाबत कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेची बैठक दि. १३.०८.२०२४ रोजी पार पडली. सदर बैठकीमध्ये संलग्नता शुल्काबाबत चर्चा झाली असता. नियामक परिषदेने संलग्नता शुल्क कमी केले असून ते खालील प्रमाणे आहे.

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रमाचा कालावधी (वर्ष) | संलग्नता शुल्क (रु.) (प्रती वर्ष) |
|---|---|---|---|
| १. | मुलभूत | १ | ७५००/- |
| २. | कला शिक्षक प्रशिक्षण (ए.टी.डी.) | २ | ७५००/- |
| ३. | रेखा व रंगकला, | ४ | १२५००/- |
| ४ | उपयोजित कला, | ४ | १२५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शिल्पकला व प्रतिमानबंध, | ४ | १२५००/- |
| ६ | अंतर्गत गृहसजावट, | २ | ७५००/- |
| ७ | वस्त्रकाम (टेक्सटाईल) | २ | ७५००/- |
| ८ | मातकाम (सिरॅमिक व पॉटरी) | २ | ७५००/- |
| ९ | धातुकाम (मेटल वर्क) | २ | ७५००/- |
| १० | कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) | १ | ७५००/- |
| ११ | आर्ट मास्टर (On Vacation)/अंशकालिन) | १ | ७५००/- |

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित कला संस्थांनी पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमनिहाय दि. ३१.०८.२०२४ पर्यंत वरील प्रमाणे शुल्क ऑनलाईनपध्दतीने भरून संलग्नता घ्यावी.

संस्थांनी संलग्नते संबंधिची माहिती मंडळाच्या www.msbae.org.in या संकेत स्थळावरून Affiliation मेनू मध्ये https://doaonline.in/institute-login या लिंकवरून ऑनलाईन पध्दतीने अचूक माहिती भरावी. संलग्नतेसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे संगणक प्रणालीद्वारे अपलोड करावीत व सर्व कागदपत्रासह नस्ती सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ यांचेकडे दि. ०३.०९.२०२४ पर्यंत जमा करावी.

संलग्नतेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेने विद्यार्थ्यांचे नामांकन ऑनलाईन पध्दतीने दि. १०.०९.२०२४ पर्यंत करावे. नियामक परिषदेच्या दि. १३.०८.२०२४ च्या बैठकीत विद्यार्थ्यांकडून रु. २००/- नामांकन शुल्क घेण्यास मान्यता दिलेली आहे. विद्यार्थ्यांचे नामांकन करावयाची लिंक मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

नियामक परिषदेच्या निर्देशानुसार, ज्या कला परिसंस्था अभ्यासक्रमांना मंडळाची संलग्नता घेणार नाहीत, त्यांना अनाधिकृत कला संस्था म्हणून घोषित करण्यात येऊन त्यांची परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणार नाही. तसेच महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद सर्व कला परिसंस्थांनी घ्यावी.

(विनोद दांडगे)

संचालक,

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाही करीता:

१. उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर.

२. निवड नस्ती.